# सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग

**प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी**

**फोन नं. ०२३६२- २२९००५ ते २२९०१०** **ई मेल -** sindhudurgdcc@gmail.com


जा.क्र. कर्ज/९९९/३१/एल.ए. २९९/**३५८८**/२०१३-१४ दि. २७/१२/२०१३

## -: परिपत्रक १७ :-

**विषय :-** निवृत्तीधारक किंवा ज्येष्ठ नागरिकांसाठी द्यावयाच्या बँकींग सेवा व 'सिंधु निवृत्ती कर्ज' धोरणातील सुधारणा.

**संदर्भ :-** जा.क्र.कर्ज/७५/२२/सेवानिवृत्ती विकास ५६/९४०/२००४-०५ दि. ०७/०६/२००४

वरील संदर्भित परिपत्रकान्वये, सिंधु निवृत्ती वेतन कर्ज योजना राबविली जात आहे.

जिल्हयातील शासकीय सेवानिवृत्तधारकांचे वेतन मोठया प्रमाणात आपल्या बँकेमार्फत होत होते. परंतू, गेल्या दोन वर्षात शासनाच्या धोरणामुळे कोअर बँकींग असलेल्या बँकांमध्ये अशी खाती वर्ग करण्यात आलेली आहेत. आपल्या बँकेचा सीबीएस प्रकल्प पूर्ण झालेला असल्याने सदरची खाती आपल्या बँकेकडे वर्ग होणेसाठी तसेच नव्याने निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन खाती आपल्या बँकेत उघडण्याच्या दृष्टीने शाखांना यापूर्वी सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील दि. ४.१०.२०१३ च्या निर्णयानुसार आपल्या बँकेचे नांव राज्य शासनाच्या निवृत्ती वेतन जमा होणाऱ्या बँकांच्या यादीत समाविष्ठ केले आहे.

निवृत्तीवेतन धारकांच्या आपल्या बँकेच्या सेवेसंदर्भातील सूचना, अडीअडचणी, बँकेबद्दलच्या अपेक्षा जाणून घेणेसाठी बँकेचे अध्यक्ष महोदय व अधिकारी यांनी नोव्हेंबर व डिसेंबर २०१३ मध्ये तालुका स्तरावरील सभेमध्ये उपस्थित राहून चर्चा केली. सदर सभेमध्ये सेवा निवृत्तीधारक व ज्येष्ठ नागरिक यांनी केलेल्या सूचनांबाबत मा. संचालक मंडळ सभा दि. २७.१२.२०१३ मधील निर्णयानुसार, नव्याने दि. १ जाने. २०१४ पासून खालीलप्रमाणे धोरण राबविण्यात यावे.

**अ) निवृत्तीधारक किंवा ज्येष्ठ नागरिकांसाठी बँकींग सेवा –**

१) ज्येष्ठ नागरिकांना (५८ वर्षावरील) ठेवीवर अर्धा टक्का जादा व्याज दिले जाते. बँकेच्या विशेष ठेव योजनांमध्ये असे व्याज दिलेले नाही. तरी यापुढे अशा विशेष ठेव योजनांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना अर्धा टक्का जादा व्याज देणेची ज्येष्ठ नागरिकांची मागणी होती. परंतू, सद्यस्थितीमध्ये कोणताही बदल करणेत आलेला नाही.

२) निवृत्तीधारक तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी बँकींग सेवा देणेकरीता बँकेच्या तालुका शाखांमध्ये मोठयाप्रमाणावर गर्दी होत असते. याकरीता मोठया शाखांनी ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्तीधारकांसाठी प्राधान्याने सेवा उपलब्ध करून द्यावी. ज्येष्ठ नागरिकांना १० मिनिटांपेक्षा अधिक काळ थांबावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी. शक्य असल्यास ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था ठेवावी.

३) तालुका शाखांनी दि. १.०१.२०१४ पासून स्पीड विंडोचा काऊंटर ज्येष्ठ नागरिकांकरीता ठेवून तसा **'जेष्ठ नागरिकांकरीता'** असा ठळक फलक काऊंटरवर लावावा.

४) जे ज्येष्ठ नागरिक आजारपण/शारिरीक कारणांमुळे बँकेमध्ये येवू शकत नाहीत. अशांकरीता महिन्यातून एकदा त्यांचे मागणीनुसार शाखेच्या २ कि.मी. अंतरापर्यंतच्या कार्यक्षेत्रामध्ये घरपोच सेवा विना मोबदला देणेत यावी. अशी सेवा दि. १.०१.२०१४ पासून प्रायोगिक तत्वावर सुरू करून त्याचा सहामाही अखेर आढावा घेणेत येईल. सदरची व्यवस्था शाखाव्यवस्थापक यांनी आपल्या शाखेतील कर्मचारी अधिकारी यांचेमार्फत करावी. घरपोच सेवा देण्याची आवश्यकता कोणत्या पेन्शनधारकांना आहे, याचा निर्णय शाखाव्यवस्थापकांनी घ्यावयाचा आहे.

**ब)** **सेवानिवृत्त वेतनाच्या तारणावर कर्जपुरवठा करणे**

निवृत्ती वेतनाच्या तारणावर कर्जपुरवठा करणेबाबतचे धोरण सन २००३ पासून राबविले जात असून, त्यामध्ये सन २००४ व २००९ मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. बदलत्या परिस्थितीचा विचार करून आवश्यक बदलांसह खालीलप्रमाणे सुधारीत धोरण राहील.

**१)** **योजनेचे नांव –**

या योजनेस **<u>"सिंधु निवृत्तीवेतन कर्ज योजना"</u>** असे संबोधण्यात येईल.

**२)** **योजनेचे निकष**

अ) अर्जदार सेवानिवृत्त असला पाहिजे. मुदतपूर्व सेवा निवृत्ती (VRS) घेतलेले निवृत्ती धारकही सदर योजनेस पात्र ठरतील.

ब) निवृत्तीवेतनधारक सिधुदुर्ग जिल्हयातील कायम रहिवासी असला पाहिजे व त्याने बँकेचे 'ब' वर्गीय सभासदत्व स्विकारलेले असले पाहिजे.

क) एक वर्ष मुदतीच्या कर्जासाठी कमाल वयोमर्यादा ७५ वर्षे व तीन वर्षे मुदतीसाठी वय ७० वर्षे पेक्षा जास्त असता नये. निवृत्तीवेतन नेणेसाठी तसेच अन्य आर्थिक व्यवहारांसाठी तो स्वतः बँकेत येत असला पाहिजे. जेणेकरून त्याच्या तंदुरूस्तीबाबत शाखा व्यवस्थापकाला त्याची कल्पना येवू शकेल. मात्र अपवादात्मक परिस्थितीत बँकेकडे असलेली ठेव विचारात घेवून ज्येष्ठ नागरिक सेवे अंतर्गत सेवा दिली जाईल.

ड) त्याचे निवृत्तीवेतनासाठी ठेव खाते आपल्या बँकेत असले पाहिजे व त्यामध्ये दरमहा निवृत्तीवेतनाची रक्कम जमा होत असली पाहिजे. अन्य बँकेत सेवानिवृत्ती वेतन जमा होत असणारा सभासद या योजनेत सहभागी होवू शकेल. मात्र कर्जासाठी असणाऱ्या दोन जामिनापैकी एक जामिन आपल्या बँकेचा खातेदार असावा. व ज्या बँकेत निवृत्ती वेतन जमा होत आहे. त्या बँकेतील त्याच्या खात्याचे ॲडव्हान्स चेक सही करून कर्ज उचलीपुर्वी दिले पाहिजे.

इ) मूळ निवृत्तीवेतनधारक मयत असल्यास त्याची पत्नी किंवा कुटुंबातील अन्य व्यक्ति निवृत्ती वेतन घेत असल्यास तिला या योजनेअंतर्गत कर्जमागणी करता येईल.

**३)** **कर्ज कारण–**

त्याच्या दैनंदिन गरजांसाठी किंवा आकस्मिक गरजांसाठी अल्पमुदत / मध्यम मुदती खावटी कारणासाठी कर्जपुरवठा.

**४)** **कर्ज मर्यादा -**

आपल्या बँकेत पेन्शन जमा होत असणाऱ्या पेन्शनरकरीता प्राप्त वेतनाच्या ५०% X कर्जाचा कालावधी किंवा जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. १,५०,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंन्नास हजार) मात्र यापेक्षा कमी असेल ती राहील. तर अन्य बँकांमध्ये पेन्शन जमा होत असणाऱ्या पेन्शरकरीता जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू.५०,०००/- (अक्षरी रूपये पंन्नास हजार) मात्र राहील.

**५)** **कर्ज मंजूरी अधिकार -**

सदर कर्ज मंजूरीचे अधिकार शाखा व्यवस्थापक यांना राहतील. कर्ज मंजूरी नंतर सदर कर्जाचे डॉक्युमेंट कार्योत्तर मंजूरीसाठी प्र.का. कडे पाठविण्यात येवू नयेत. मंजूर कर्जाची नियमित मासिक हप्ता पध्दतीने (EMI) वसूली करावयाची आहे.

**६)** **कर्जाची मुदत -**

सदर कर्जाची कमाल मुदत ही ३ वर्ष (३६ महिने) राहील व कर्जाची परतफेड समान मासिक हप्त्यात सव्याज करावयाची आहे. सदरचे कर्ज हे मासिक हप्ता पध्दती (EMI) ने राहील.

**७) व्याजदर –**

सदर कर्जाचा व्याजदर प्रचलित दरानुसार १३% (EMI) राहील.

**८) तारण –**

अर्जदाराला मिळणारे मासिक सेवानिवृत्ती वेतन हेच मुख्य तारण समजण्यात येईल.

१. आपल्या बँकेत पेन्शन जमा होणाऱ्या पेन्शनरकरीता रू. १०,०००/- पर्यंत पेन्शन कर्जासाठी वयाची तशीच जामीनदाराची अट राहणार नाही.

२. आपल्या बँकेत पेन्शन जमा होणाऱ्या पेन्शनरकरीता रू. २०,०००/- पर्यंतचे कर्ज पेन्शनच्या तारणावर दिले जाईल. त्याकरीता जामीन घेण्यात येवू नये.

३. रू. २०,००१/- ते रू. ५०,०००/- पर्यंतच्या कर्जासाठी बँकेचा खातेदार असलेला एक जामीनदार घेण्यात यावा.

४. मात्र वरील तिन्ही कारणांकरीता अन्य बँकेत पेन्शन जमा होत असणाऱ्या कर्जदारासाठी आपल्या बँकेत पगार / पेन्शन जमा होणारा जामीनदार घेणेत यावा.

५. रू. ५०,०००/- वरील कर्जासाठी दोन जामीनदार घेणेत यावेत. पैकी एक जामीनदार हा पेन्शनधारकाचा वारसदार असावा. मात्र वारस नसल्यास दोन्ही जामीनदार हे पेन्शनर/नोकरदार किंवा ज्याचे नांवे ७/१२ वर क्षेत्र असून बँकेत खाते आहे असे सक्षम असावेत.

**९) कर्जाच्या सर्वसाधारण अटी व नियम –**

१. अर्जदार यांनी आपल्याला मिळणाऱ्या मासिक सेवा निवृत्ती वेतनामधून कर्जाचा हप्ता व व्याजाची रक्कम त्याच्या खात्यातून वळती करून घेण्याबाबतचे अधिकारपत्र कर्जउचलीपूर्वी सादर केले पाहिजे.

२. कर्ज कालावधीत कर्जदाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या पश्चात त्याची पेन्शन मिळणाऱ्या व्यक्तीकडून वसूल केली जाईल.

३. पेन्शनदाराच्या पश्चात पेन्शन घेणारी व्यक्ति नसल्यास जामिनदाराकडून किंवा त्यांच्या वारसाकडून सदर कर्जाची वसुली केली जाईल.

४. काही कारणास्तव सलग तीन हप्ते वसुल झाले नाहीत तर संपूर्ण कर्ज रक्कम जामिनदाराकडून वसूल केले जाईल.

५. कर्ज हप्ता व व्याज याची एकूण रक्कम ही त्याला मिळणाऱ्या मासिक सेवा निवृत्ती वेतनाच्या ५०% पेक्षा जास्त असू नये.

६. सदर कर्जाकरीता अल्पमुदती कर्ज *कोड नं.* ***१६६०५*** व मध्यम मुदत कर्ज *कोड नं.* ***१९८१४*** असा राहील.

सदरचे सुधारीत परिपत्रक शाखेतील सर्व अधिकार/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून कर्ज वितरण करण्यात यावे.

**ब)　सेवानिवृत्त वेतनाच्या तारणावर कर्जपुरवठा करणे**

निवृत्ती वेतनाच्या तारणावर कर्जपुरवठा करणेबाबतचे धोरण सन २००३ पासून राबविले जात असून, त्यामध्ये सन २००४ व २००९ मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. बदलत्या परिस्थितीचा विचार करून आवश्यक बदलांसह खालीलप्रमाणे सुधारीत धोरण राहील.

**१)　योजनेचे नांव –**

या योजनेस **"सिंधु निवृत्तीवेतन कर्ज योजना"** असे संबोधण्यात येईल.

**२)　योजनेचे निकष**

अ)　अर्जदार सेवानिवृत्त असला पाहिजे. मुदतपूर्व सेवा निवृत्ती (VRS) घेतलेले निवृत्ती धारकही सदर योजनेस पात्र ठरतील.

ब)　निवृत्तीवेतनधारक सिधुदुर्ग जिल्हयातील कायम रहिवासी असला पाहिजे व त्याने बँकेचे 'ब' वर्गीय सभासदत्व स्विकारलेले असले पाहिजे.

क)　एक वर्ष मुदतीच्या कर्जासाठी कमाल वयोमर्यादा ७५ वर्षे व तीन वर्षे मुदतीसाठी वय ७० वर्षे पेक्षा जास्त असता नये. निवृत्तीवेतन नेणेसाठी तसेच अन्य आर्थिक व्यवहारांसाठी तो स्वतः बँकेत येत असला पाहिजे. जेणेकरून त्याच्या तंदुरूस्तीबाबत शाखा व्यवस्थापकाला त्याची कल्पना येवू शकेल. मात्र अपवादात्मक परिस्थितीत बँकेकडे असलेली ठेव विचारात घेवून ज्येष्ठ नागरिक सेवे अंतर्गत सेवा दिली जाईल.

ड)　त्याचे निवृत्तीवेतनासाठी ठेव खाते आपल्या बँकेत असले पाहिजे व त्यामध्ये दरमहा निवृत्तीवेतनाची रक्कम जमा होत असली पाहिजे. अन्य बँकेत सेवानिवृत्ती वेतन जमा होत असणारा सभासद या योजनेत सहभागी होवू शकेल. मात्र कर्जासाठी असणाऱ्या दोन जामिनापैकी एक जामिन आपल्या बँकेचा खातेदार असावा. व ज्या बँकेत निवृत्ती वेतन जमा होत आहे. त्या बँकेतील त्याच्या खात्याचे ॲडव्हान्स चेक सही करून कर्ज उचलीपुर्वी दिले पाहिजे.

इ)　मूळ निवृत्तीवेतनधारक मयत असल्यास त्याची पत्नी किंवा कुटुंबातील अन्य व्यक्ति निवृत्ती वेतन घेत असल्यास तिला या योजनेअंतर्गत कर्जमागणी करता येईल.

**३)　कर्ज कारण–**

त्याच्या दैनंदिन गरजांसाठी किंवा आकस्मिक गरजांसाठी अल्पमुदत / मध्यम मुदती खावटी कारणासाठी कर्जपुरवठा.

**४)　कर्ज मर्यादा –**

आपल्या बँकेत पेन्शन जमा होत असणाऱ्या पेन्शनरकरीता प्राप्त वेतनाच्या ५०% X कर्जाचा कालावधी किंवा जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. १,५०,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंन्नास हजार) मात्र यापेक्षा कमी असेल ती राहील. तर अन्य बँकांमध्ये पेन्शन जमा होत असणाऱ्या पेन्शरकरीता जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू.५०,०००/- (अक्षरी रूपये पंन्नास हजार) मात्र राहील.

**५)　कर्ज मंजूरी अधिकार –**

सदर कर्ज मंजूरीचे अधिकार शाखा व्यवस्थापक यांना राहतील. कर्ज मंजूरी नंतर सदर कर्जाचे डॉक्युमेंट कार्योत्तर मंजूरीसाठी प्र.का. कडे पाठविण्यात येवू नयेत. मंजूर कर्जाची नियमित मासिक हप्ता पध्दतीने (EMI) वसूली करावयाची आहे.

**६)　कर्जाची मुदत –**

सदर कर्जाची कमाल मुदत ही ३ वर्ष (३६ महिने) राहील व कर्जाची परतफेड समान मासिक हप्त्यात सव्याज करावयाची आहे. सदरचे कर्ज हे मासिक हप्ता पध्दती (EMI) ने राहील.